follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २९८ सातारा सोमवार दि १५ जुलै २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# राज्यातील महिलांसाठी अर्थ संकल्पात ४६ हजार कोटींची तरतूद

**बारामती :** राज्यातील महिलांना न्याय देण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून त्यांना जनसामान्यांची भूमिका राज्य सरकारने घेतली असून, महिलांसह प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती येथील जनसन्मान मेळाव्यात बोलताना दिली आहे.

**राष्ट्रवादीचे बडे नेते उपस्थित**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने बारामती शहरातील मिशन हायस्कूल मैदानावर आयोजित जनसन्मान मेळाव्यात अजित पवार बोलत होते. यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, खासदार प्रफुल्ल पटेल, खा .सुनेत्रा पवार यांच्यासह छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील,



धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ, अनिल पाटील, धर्मराव अत्राम, बाबा सिद्दिकी,संजय बनसोडे, रामराजे नाईक -निंबाळकर, नरहरी झिरवळ, रुपाली चाकणकर, प्रदीप गारटकर यांच्या सह राष्ट्रवादीचे अनेक आमदार व पदाधिकारी या प्रसंगी उपस्थित होते.

'एखाद्या राज्याच्या बजेटही एवढे नसते'

अर्थसंकल्पात राज्य सरकारने मांडलेली

## पवार यांची जनसन्मान मेळाव्यात माहिती!

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कार्यान्वित केलेली असून, या माध्यमातून राज्यातील पात्र महिलांना ४६ हजार कोटी रुपये राज्य सरकार उपलब्ध करुन देणार आहे. एखाद्या राज्याचे एवढे बजेट नसते, एवढी तरतूद राज्यातील महिलांसाठी करण्यात आली आहे. महिलांसह शेतकरी, विद्यार्थी, वारकरी, दुर्बल घटकांसाठीही अर्थसंकल्पात सरकारने काही तरी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. पायाभूत सुविधा निर्मितीसह अन्य क्षेत्रातील महत्त्वाच्या योजनांना गती दिली जाणार आहे.

**शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी अमित शहांना भेटणार**

उसाची एमएसपी (किमान विक्री किंमत) वाढविण्याबाबत केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांना विनंती केली असून, त्यांना उद्याच लेखी निवेदन देणार आहे. कांदा आयात केलेला नसल्याचेही त्यांनी नमूद केले. आदिवासी व दलित घटकांसह सर्वच घटकातील महिलांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. या योजनेसाठी असणाऱ्या जाचक अटी शिथिल केल्या आहेत. राज्यातील शेतकऱ्यांचे वीज बिल माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. छत्रपती शिवराय, फुले शाहू आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन आम्ही प्रत्येक घटकासाठी निर्णय घेतला आहे. असेही अजित पवार यावेळी म्हणाले आहे.

**भर पावसात सभा सुरू**

जन सन्मान मेळाव्याच्या सुरुवातीपासून पावसाला सुरुवात झाली. मात्र राज्यातील कार्यकर्ते डोक्यावर खुर्ची घेऊन सभेत थांबून होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कार्यकर्ते पावसात भिजत असल्याचे पाहून स्वतः डायस स्टेजच्या पुढील भागासमोर घेऊन त्यांनी भाषणास सुरुवात केली. यावेळी त्यांच्यासोबत खासदार सुनेत्रा पवार यांच्यासह प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, धनंजय मुंडे, रूपाली चाकणकर हे नेते देखील अजित पवार यांच्यासोबत पावसात उभे राहिले. उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत असताना कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करून त्यांच्या निर्णयाचे स्वागत केले.

# ओबीसींचे आरक्षण न काढता मराठ्यांना आरक्षण : शंभूराज देसाई

**मुंबई :** ओबीसींचे आरक्षण न काढता मराठा समाजाला आरक्षण देण्यावर सरकार ठाम आहे. आरक्षणाच्या मुद्यावर तोडगा काढण्यासाठी बोलाविलेल्या बैठकीपासून तीनही विरोधी पक्षाच्या नेत्यांनी पळ काढला. पण सरकार थांबलेले नाही. आरक्षणाच्या प्रक्रियेमध्ये एकही दिवस वाया घालविला नसल्याचे मत उत्पादनशुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी व्यक्त केले आहे.

नवी मुंबईमध्ये पाटण तालुक्यातील रहिवाशांच्या मेळाव्याप्रसंगी माध्यमांशी बोलताना शंभुराज देसाई यांनीमराठा आरक्षणाविषयीमत व्यक्त केले. कोणाचे आरक्षण काढून दुसऱ्याला दिले जाणार नाही. ओबीसींचे आरक्षण कमी न करता मराठा



समाजाला आरक्षण देण्यावर सरकार ठाम आहे. शासनाने स्वतंत्र १० टक्के आरक्षण दिले आहे ते कोर्टात टिकेल. कुणबी प्रमाणपत्रासाठीची कार्यवाही सुरू आहे. हैद्राबाद संस्थानामधील नोंदी तपासण्यात आल्या आहेत. तेथील सर्व दाखले प्रमाणीत करून ताब्यात घेण्यात येणार आहेत. एक महिन्यापुर्वी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली होती.

तेव्हापासून आरक्षणाच्या प्रक्रियेमध्ये एक दिवसही वाया घालविलेला नाही. ओबीसी वमराठा आरक्षणावरतोडगा काढण्यासाठी सर्वपक्षीय बैठक आयोजीत केली होती. पण त्या बैठकीपासून तीनही प्रमुख विरोधी पक्षाच्या नेत्यांनी पळ काढल्याची टिकाही त्यांनी केली.मेळाव्यात बोलताना महायुती सरकारने दोन वर्षात केलेल्या विकास कामांच्या बळावर येणाऱ्या निवडणुकीला सामोरे जावे लागणार आहे.

विरोधक खोटा प्रचार करण्याचा प्रयत्न करतील त्यांच्या नरेटीव्हला बळी पडू नका असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. मेळाव्यास शिंदे सेनेचे उपनेते विजय नाहटा, नवी मुंबई जिल्हा प्रमुख विजय चौगुले, विजय माने, यांच्यासह पाटण तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

# पंढरपुरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दुचाकीवरून केली सुविधांची पाहणी

**सोलापूर :** राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन व आरोग्य मंत्री प्रा. तानाजी सावंत यांनी पंढरपुरातील सेवा सुविधांची पाहणी आज मोटरसायकलवर फिरून केली. दरम्यान, बुधवारी पंढरपुरात आषाढीचा महासोहळा होणार आहे.

या सोहळ्यानिमित्त पंढरपुरात पंधरा लाख भाविक दाखल होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्याचं अनुषंगाने वारकऱ्यांना देण्यात येत असलेल्या सेवा सुविधांची



पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे रविवारी पंढरपुरात दाखल झाले. त्यांच्यासोबत ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन व आरोग्यमंत्री प्रा. तानाजी सावंत यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते.

प्रारंभी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे निळोबारायांच्या पालखी सोहळ्यात दाखल झाले. काही अंतर पायी चालत भजन करीत विठ्ठलाचे नामस्मरण केले.

त्यानंतर प्रशासनाच्या वतीने पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधांची पाहणी केली. पालखीतळ, चंद्रभागा नदीचा किनारा, दर्शन रांग, ६५ एकर वाळवंट परिसर, मंदिर परिसर आदी विविध ठिकाणची पाहणी मोटारसायकलवर फिरून केली अन् आवश्यक त्या महत्त्वाच्या सूचना प्रशासनाला दिल्या.

## सिंहगडाच्या पायवाटेवर कोसळली दरड

**पुणे :** दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू असून, रविवार असल्याने अनेक पर्यटक किल्ले सिंहगडावर फिरायला जातात. पण रविवारी पहाटे पायवाटेवर दरड कोसळली, त्यामुळे रस्ता बंद झाला. त्या मार्गावरून जाताना पर्यटकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन वन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. पावसाचे दिवस असल्यानेपुणेकरघराबाहेर पडत आहेत. पर्यटनस्थळांवरगर्दी करत आहेत. किल्ले सिंहगड हा तर पुणेकरांच्या सर्वात आवडते पर्यटनस्थळ आहे. या ठिकाणी एरव्ही देखील गर्दी होते. रविवारी तर प्रचंड गर्दी पहायला मिळते.

# देवेंद्र फडणवीस मराठा समाजाला आरक्षण मिळू नये म्हणून दबाव आणत असतील : मनोज जरांगे

**मुंबई :** एक महिना झाला. वेळ संपला. मराठ्यांना ओबीसी आरक्षण द्या, असे आवाहन सरकारला करतानाच मी पुन्हा २० जुलैपासून अंतरवाली सराटीत उपोषणाला बसणार असून, त्याच दिवशी हे २८८ उमेदवार पाडायचे की आपण उभे करायचे हे ठरवू, अशी पुढील रणनीती मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी घोषित केली. यानंतर आता सरकारची भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि छगन भुजबळयांचे नाव घेऊन पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील यांनी मोठे आरोप केले आहेत. पत्रकारांशी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले की,अजित पवारयांच्या पक्षाचे दोन-तीन पालकमंत्री मराठ्यांच्या विरोधात षडयंत्र करत आहेत. दिलेल्या मुदतीत आरक्षण न मिळाल्यास त्याचा दोष सरकारला देऊन उपयोग नाही. सरकारवरचा आमचा विश्वास उडाला आहे, असे कधीही म्हटले नाही. मात्र,देवेंद्र फडणवीसमराठा समाजाला आरक्षण मिळू नये म्हणून इतर मंत्र्यांवर दबाव आणत असतील, असा मोठा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला.त्यांनाछगन भुजबळगरजेचे आहेतआम्हाला जे काही दिसत आहे, त्यावर काम करणे गरजेचे आहे. मला आमचा समाज महत्त्वाचा आहे.

एक महिन्याचा वेळ दिला होता. या महिन्यात काय केले, हे आमच्या लक्षात आले आहे. आम्हाल १३ तारखेपर्यंत आरक्षण मिळाले नाही, हेच दिसत आहे. आम्ही संयम बाळगला आहे. जर तसे नसते, तर शंभुराज देसाईंचा शब्द पाळला नसता. देवेंद्र फडणवीस करू देत नसतील किंवा मराठ्यांना काही मिळू देत नसतील.

# कोकणात मुसळधार, रेल्वेसेवा ठप्प, नद्यांच्या पाणी पातळीत वाढ,

**मुंबई :** राज्यातील अनेक भागांत मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र,मुंबईपरिसर आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यामध्ये मुसळधार पाऊसाने थैमान घातले आहे. अनेक नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे गावांचा संपर्क तुटला आहे.रायगड,रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना हवामान विभागाकडून आज 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला आहे. यामुळेरत्नागिरी,रायगडमध्येप्रशासन अलर्ट मोडवर असून अनेकांना स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत होताना दिसत आहे. रत्नागिरी जिल्ह्यातल्या संगमेश्वर तालुक्यात कोंड, आंबेड-डिंगणी-कर्जुवे, धामणी, कसबा, फणसवणे भागात रस्त्यावर पाणी भरले आहे. त्यामुळे या भागातील वाहतूक बंद ठेवण्यात आली आहे. तसेच, सर्वांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. याचबरोबर, रत्नागिरीतील खेड-दिवाणखवटी येथे नदीला पूर आला असून सात गावांचा संपर्क तुटला आहे. गणेशवाडीतील सात वाड्यांचा संपर्क तुटला आहे. या मुसळधार पावसामुळे ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाल्यामुळे प्रशासन अलर्ट मोडवर आहे.कोकण रेल्वेसेवा विस्कळीत

रत्नागिरी जिल्ह्यातीलमुसळधार पावसाचा फटका कोकण रेल्वेलाही बसला आहे. चिपळूण, खेड येथे पाणी भरल्याने रेल्वेच्या गाड्या स्थानकात थांबवून ठेवण्यात आल्या आहेत. दिवाणखवटी स्थानकाजवळ रूळावर दरड कोळल्यामुळे रेल्वेसेवा ठप्प झाली आहे.

रविवारी (दि.१४) रोजी सकाळपासूनच पावसाने जोर धरला असल्यामुळे कोकण रेल्वेचे वेळापत्रक विस्कळित झाले होते. तुतारी एक्स्प्रेस, कोकणकन्या एक्स्प्रेस दोन तास ऊशीराने धावत होत्या तर एर्नाकूलम- हजरत निजामुद्दीन नेत्रावती एक्स्प्रेस तर सात तास ऊशिराने धावत होती. यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत.रायगडमध्ये नद्यांच्या पाणीपातळीत वाढ

रायगड जिल्ह्यात सुद्धा मुसळधार पाऊस पडत असल्याने जिल्ह्यातील दरडप्रवण अन पूरप्रवण गावांवर जिल्हा प्रशासनाने अधिक लक्ष केंद्रीत केले आहे. या गावांना सतर्क राहण्याचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे. तसेच, कुंडलिका, पाताळगंगा आणि अंबा या नद्यांनी इशारा पातळी ओलांडली असून रोहा, नागोठणे, खालापूर, खोपोली आणि आपटा परिसरातल्या नागरिकांना प्रशासनानं सतर्कतेचा इशारा दिला आहे. या नद्यांजवळच्या गावातील प्रशासनाने घेतलेली खबरदारी, पर्यायी व्यवस्था, यंत्रणेची सुसज्जता याची माहिती जिल्हा प्रशासनाकडू घेण्यात आली आहे. मुसळधार पावसामुळे सर्व यंत्रणेला सुसज्ज राहण्याचे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.

# गुजरातमध्ये भीषण अपघात!

## अहमदाबाद-वडोदरा हायवेवर ट्रक-बसची धडक, ६ जणांचा मृत्यू

**गुजरात :** गुजरातमधील आणंदजवळ अहमदाबाद-वडोदरा एक्सप्रेस हायवेवर ट्रक आणि लक्झरी बसमध्ये जोरदार धडक झाली. याअपघातात६ जणांचा मृत्यू झाला, तर ८ जण गंभीर जखमी झाले आहेत. महाराष्ट्रातून राजस्थानला जाणाऱ्या बसला मागून धडक बसल्यानेअपघातझाला.

अग्निशमन दल आणि स्थानिक पोलिसांसह आपत्कालीन सेवा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या आहेत.

राजस्थानला जात होती बसलक्झरी बस महाराष्ट्रातून राजस्थानला जात होती. पहाटे साडेचारच्या सुमारास हा अपघात झाला. या अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर तिघांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून जखमींना आणंद जिल्ह्यातील विविध रुग्णालयात दाखल केलं. तर इतर जखमींचीही प्रकृती चिंताजनक असल्याचं सांगण्यात येत आहे.

भीषण अपघातात सहा जणांचा मृत्यूपोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजस्थानला जाणाऱ्या बसचा टायर पंक्चर झाल्याने ती महामार्गाच्या बाजूला उभी होती. बस चालक, क्लीनर आणि प्रवासी बसच्या बाहेर येऊन उभे होते. त्याच दरम्यान मागून येणाऱ्या ट्रकने धडक दिली. या भीषण अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. तर अनेकजण जखमी झाले.

# पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांसाठी पेन्शन

## वारकरी महामंडळ स्थापण्याचा निर्णय

**मुंबई :** राज्यातील कीर्तनकार व वारकऱ्यांसाठी कल्याणकारी योजना राबविण्यासाठी तसेच त्यांना सोयीसुविधा पुरविण्यासाठी 'मुख्यमंत्री वारकरी महामंडळ' स्थापन करण्याचा निर्णय रविवारी राज्य शासनाने जारी केला. परंपरेने महिन्याची पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांना महामंडळाच्या माध्यमातून वृद्धापकाळात 'वारकरी पेन्शन' योजना सुरू करण्यात येणार आहे. राज्यात वारकरी मंडळ स्थापन करण्याची घोषणा अर्थसंकल्पात



उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी केली होती.

या महामंडळाचे मुख्यालय हे पंढरपूर येथे असेल. महामंडळावर कार्यरत किंवा सेवानिवृत्त भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात येईल. या महामंडळाला ५० कोटींचे भागभांडवल देण्यात येणार आहे. महामंडळाच्या योजनाप सर्व पालखी मार्गांची सुधारणा, स्वच्छता, आरोग्य, निवारा व सुविधा यासाठी दरवर्षी आर्थिक तरतूद करून नियोजन. प आषाढी व कार्तिकी वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांना सुरक्षा, विमा संरक्षण कवच.प वारकरी भजनी मंडळाला भजन व कीर्तन साहित्यासाठी (टाळ, मृदंग, वीणा आदी)

# तोपर्यंत कोणीच संविधानाला धक्का लावू शकणार नाही : अजित पवार

**बारामती :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरराष्ट्रवादी काँग्रेसचेनेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्रीअजित पवारयांनी आपल्या बालेकिल्ल्यातून शक्तीप्रदर्शनाची सुरुवात केली. राष्ट्रवादीअजित पवारगटाची आजबारामतीमध्येजन सन्मान मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात अजित पवार यांनी भर पावसात भाषण केले. यावेळी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह विविध मुद्द्यांवर भाष्य केले. तसेच, विरोधकांकडून होणाऱ्या टिकेलाही अजित पवार यांनी प्रत्युत्तर दिले.

लोकसभा निवडणुकीत संविधान बदलतील असा खोटा प्रचार आमच्याविरोधात (महायुती) करण्यात आला. मात्र, चंद्र आणि सूर्य आहे तोपर्यंत संविधानाला कोणी धक्का लावणार नाही. मी जो शब्द देतो, तो पूर्ण करतो. कुणी गैरसमज



निर्माण केले तर आमचा महायुतीवर विश्वास आहे असं सांगा. शाहु-फुल-आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात काम करत असताना कुणावरही अन्याय होणार नाही, याची खबरदारी आम्ही घेऊ असा शब्द मी देतो, असे अजित पवार यांनी सांगितले. आम्ही खोटं बोलणार नाही, सत्ता येते सत्ता जाते. सत्तेसाठी आम्ही हापापलेलो नाहीत. सत्तेचा ताम्रपाठ घेऊन कोणी आलेलं नाही. मिळालेल्या सत्तेचा वापर गरीबांसाठी, शेतकऱ्यांसाठी, महिलांसाठी झाला पाहिजे, असे अजित पवार म्हणाले. तसेच, एमएसपी संदर्भात बोलताना अजित पवार यांनी सांगितले की, मी काल अमित शाह यांची भेट घेतली व साखरेच्या संदर्भात त्यांच्याशी बोलणी केली. एमएसपी वाढवायला पाहिजे असं त्यांना सांगितलं. त्या संदर्भातील निवेदन त्यांना उद्या देणार असल्याचे अजित पवार म्हणाले.

महायुतीचे सरकार शेतकऱ्यांच्या हिताचं आहे. आम्ही कुठेही कांदा आयात केला नाही. दुधाची पावडर आयात केली नाही. दुधाचे दर वाढत नाही, तोपर्यंत प्रतिलिटरला सरकारने ५ रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. शहरातील लोकांना ही भाजीपाला दूध वाजवी दरात मिळाला पाहिजे. पण शेतकऱ्यालाही त्याची चांगली किंमत मोबदला मिळाला पाहिजे, असे अजित पवार यांनी सांगितले. तसेच, जगाची आर्थिक राजधानी मुंबई करायची आहे.

चुकीच्या प्रचारावर, जो काही नॅरेटीव्ह सांगायचा प्रयत्न करतील त्यावर विश्वास ठेऊ नका. वरुणराजा सुद्धा आपल्यासोबत आहे, असे अजित पवार म्हटले.याचबरोबर, जनसन्मान मेळाव्यातून प्रत्येक जिल्हा, तालुका ढवळून काढायचा आहे, असे सांगत आजची सभा केवळराष्ट्रवादी काँग्रेसचीआहे. मात्र, यापुढे महायुतीच्या संयुक्त सभा होतील. विधानसभा निवडणुकीपर्यंत या सभा सुरु राहतील. राष्ट्रवादी काँग्रेसने विकासाला प्राधान्य दिले, विकासाला डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस काम करत राहील. हाच झंजावात आपल्याला चालू ठेवायचा आहे, असेही अजित पवार यांनी सांगितले.

### सासवडचे सुपुत्र नंदकुमार झणझणे यांच्या वाढदिवसानिमित्त

# वृक्षारोपण विविध उपक्रमानी साजरा



**आदर्की :** सहकारी, जिवलग मित्रबंधु, गोर गरीब गरजुना मदत करण्यासाठी सदैव तत्पर राहणारे,शिवनंदन पतसंस्था सासवड तथा वाघेश्र्वरी दुधसंकलन केंद्र सासवड चे चेअरमन,माजी ग्रामपंचायत सदस्य, सासवड गावचे आगामी कुशल नेत्रुत्व मा श्री नंदकुमार लक्ष्मण झणझणे यांचे वाढदिवसानिमित्ताने वाढत्या ग्लोबल वॉर्मिंग चे पर्यावरणावर होणारे परिणाम व त्यामूळे निसर्गाचे होत असलेले असंतुलन आणि त्यामूळे त्याचे मानवी जीवनावर दिसत असलेले विचित्र परीणाम, यासाठी निसर्गाचे संतुलन राहणेसाठी आवश्यक प्रयत्न करणे हे या निसर्गाच्या सानिध्यात राहुन वास्तव करणाऱ्या प्रत्येक घटकाचे कर्तव्य आहे.

आणि याच सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून सासवड गावचे माजी ग्रामपंचायत सदस्य व शिवनंदन पतसंस्थेचे चेअरमन मा श्री नंदकुमार लक्ष्मण झणझणे यांनी वाढदिवसाला फालतू खर्च करण्याचे टाळून पर्यावरणपूरक उपक्रम राबविणे हा त्यांचा नेहमीच कयास असतो,व या अशा उपक्रमाच्या माध्यमातूनच समाजाला एक चांगला संदेश देणे हाच मुख्य उद्देश आहे. आज वाढदिवसाचे औचित्य साधून वाघेश्र्वरी दुधसंकलन केंद्र चे सर्व दूध उत्पादक तसेच शिवनंदन ग्रामीण बिगशेती सहकारी पतसंस्थेचे सर्व सभासद यांना त्यांच्या घरपोहोच तसेच वाढदिनानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी आलेले मित्रपरिवार व ग्रामस्थ यांना केशर आंबा चे जवळपास एक हजार रोप वाटप करण्यात आले. या माध्यमातुन निसर्गाचा समतोल राखण्याबरोबरच शेतकऱ्यांना ही या झाडांच्या संगोपणातून केशर आंब्याचे उत्पादन होईल हा दुहेरी हेतू साध्य करण्यात केला.

याबरोबरच महात्मा फुले हायस्कूल व ज्युनियर कॉलेज सासवड येथे ११वी व १२ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना स्कुल बॅग चे वाटप करण्यात आले.

त्याचबरोबर सासवड व टाकोबाईचीवाडी येथुन बरेचशे पुरुष व महीला वारकरी हे माऊलींच्या पालखी सोहळ्यात पायीवारीसाठी वासकर महाराज यांची माऊलींच्या रथापुढे दिंडी क्र.१ व ७ मध्ये जात असतात. त्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी दैनंदिन नैसर्गिक विधीसाठी पाण्याची समस्या लक्षात घेऊन श्री क्षेत्र आळंदी ते पंढरपूर दिंडीसोबत कायम मुक्कामी पाण्याची गाडीची व्यवस्था करून दिली, व वारकरी भक्तांची गैरसोय टाळली. वाढदिसानिमित्त अश्या पद्धतीनं नावीन्यपूर्ण उपक्रम राबवल्याबद्दल समस्त ग्रामस्थ सासवड व टाकोबाईचीवाडी यांचेकडून श्री नंदकुमार झणझणे यांचे कौतुक होत आहे. या पुढील काळातही जनहितार्थ नवनविन उपक्रम गावामध्ये राबविणे ज्यामूळे जनसामान्यांना दैनंदिन जीवनात त्याचा उपयोग होईल यासाठी सदैव प्रयत्नवादी राहणे हाच त्यांचा ध्यास आहे. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

# शेतकऱ्यानी खरिप हंगामातील पिकांचा विमा योजनेत सहभागी व्हावे : सुहास रणसिंग

**आदर्की :** फलटण तालुक्यात काही भागात चांगला तर काही भागात कमी पाऊस झाला असला तरी खरिप हंगामातील पिंकाची उगवण चांगली झालेची दिसत आहे

आगामी काळात कोणतीही नैसर्गिक आपत्तीला सामोरे जाण्यासाठी शेतकर्यांनी पिकांचा पिक विमा काढण्याचे आवाहन फलटण तालुका उपविभागीय अधिकारी सुहास रणसिंग यांनी केले. घाडगेवाडी ता फलटण समर्थ कृषी अग्रोटेक कृषी केंद्राच्या उदघाटन प्रसगी बोलत होते

यावेळी फलटण तालुका कृषी अधिकारी दत्तात्रय गायकवाड गजानन ननावरे फलटण पंचायत समिती गुणनियंत्रण अधिकारी नवनाथ फडतरे जिल्हा प्रभारी अधिकारी अमरसिंह निंबाळकर कृषी सहायक प्रतिभा जाधव हर्षद बोबडे उपस्थित होते.

सुहास रणसिंग पुढे म्हणाले फलटण तालुक्यात साडेतिनशे कृषी केंद्र आहेत तरी घाडगेवाडी येथे हर्षद बोबडे यांनी स्वामी समर्थ कृषी अग्रोटेक नावाने कृषी केंद्र सुरु केले आहे हर्षदने शेतकरयांच्या बांधावर जावून मार्गदर्शन करावे व पिंकाना लागेल तेवढेच औषधे व खते कीडनाशके नामांकित कंपनीची देवून शेतकरयाचे हित पाहावे असे आवाहन केले. सर्वाचे स्वागत व आभार हर्षद बोबडे यांनी मानले. कार्यक्रमास शेतकरी ग्रामस्थ उपस्थित होते.



**घाडगेवाडी येथे स्वामी समर्थ कृषी अग्रोटेक केद्राचे उदघाटन करताना सुहास रणसिंग दत्तात्रय गायकवाड अमरसिंह निंबाळकर हर्षद बोबडे व इतर.**

### मतदारसंघातील ग्रामपंचायत कार्यालय बांधकामासाठी ४ कोटी ६५ लाख मंजुर आमदार मकरंद पाटील

**वाई :** मतदारसंघातील ग्रामपंचायतीना स्व:ताच्या कार्यालय इमारत बांधकामासाठी मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेअंतर्गत वाई महाबळेश्वर तालुक्यातील २३ ग्रामपंचायत कार्यालयासाठी रुपये ४ कोटी ६५ लाख मंजुर झाले असल्याची माहीती आ. पाटील यांनी दिली. सदर निधी मंजुर केल्याबद्दल आ. पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजिदादा पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

## आ बाळासाहेब पाटील यांचे प्रयत्नाने हणबरवाडी साकव पूलास ६० लाख

**मसूर :** माजी सहकार, पणन मंत्री व आमदार बाळासाहेब पाटील यांचे विशेष प्रयत्नाने जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत सर्वसाधारण साकव पूल योजनेमधून हणबरवाडी ता. कराड येथील ग्रामपंचायत शेजारील ओढ्यावर साकव पूल बांधणे रक्कम रू.६० लाख कामास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

हणबरवाडी ग्रामस्थांची आमदार बाळासाहेब पाटील यांच्याकडे साकव पूलाबाबतची सातत्याने मागणी होती. ग्रामस्थांना शेतीमाल ने-आण करणेस व दैनंदीन दळणवळण करण्यास फार त्रासाचे होत होते. या रस्त्याच्या अडचणीमुळे लोकांना फार दुर अंतरावरून जावे लागत होते. सदरच्या ओढ्यावर साकव पूल बांधलेस लोकांची दैनंदीन दळणवळणाची व शेतीमाल ने-आण करणेची चांगली सोय होणार आहे. लोकांच्या वेळेचीही बचत होणार आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

# सामाजिक बांधिलकीतुन माजी सैनिक प्रविण नलवडे यांनी महिलांचे भरले १६० फार्म

आदर्की : फलटण तालुक्यातील ग्रामिण भागात मुस्व्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे कागदपत्राची जुळवाजुळव आणि फार्म भरण्यासाठी धावपळ सुरू असताना बिबी येथिल माजी सैनिक प्रविण नलवडे यांनी सामाजिक बांधलिकी जपत गावातील १६० महिलांचे मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे फार्म भरून देवुन सामाजिक बांधिलकी जपल्याने त्यांचे परिसरातुन कौतुक होत आहे

फलटण तालुक्याच्या पश्चिम भागात मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना जाहिर होताच महिलांची कागद पत्र गोळा करण्यासाठी ताराबळ उडाली असतानाच बिबी येथिल माजी सैनिक प्रविण बळवंतराव नलवडे हे सामाजिक बांधिलकी जपत कै काशिनाथ बोबडे सुभागृहात मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे महिलांचे १६० फार्म भरून देण्यात आले

यावेळी श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर संजीवराजे नाईक निंबाळकर आमदार दीपक चव्हाण, जेष्ठ नेते श्री प्रल्हाद साळुंखे पाटील, जिल्हा परिषद सदस्य श्री धैर्यशील अनपट, माजी पंचायत समिती सदस्य धनंजय दादा साळुंखे पाटील, संतकृपा उद्योग समूहाचे सर्वेसर्वा श्री विलासराव नलावडे, श्रीराम सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री नितीन शाहूराजे भोसले, रावसाहेब विक्रम भोसले, श्री शरद जाधव, जेष्ठ वार्ताहार श्री सूर्यकांत निंबाळकर यांनी उपक्रमा बद्धल कौतुक केले

कार्यक्रमासाठी बिबी गावच्या सरपंच रुपाली बोबडे, उपसरपंच सचिन बोबडे, बिबी पोलीस पाटील अजित बोबडे, वि का स सोसायटी चे चेअरमन बळवंतराव नलावडे, माजी पंचायत समिती सदस्य महेंद्रकुमार गांधी, हरिभाऊ बोबडे, जर्नाद बोबडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनिल बोबडे, वन व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अण्णासाहेब बोबडे, सोसायटी चे माजी चेअरमन मनोहर बोबडे, तंटामुक्ती अध्यक्ष श्री रुपचंद नलावडे, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी सुरेश बोबडे , किरण बोबडे जयकुमार भोसले आदी ग्रामस्थ महिला उपस्थित होत्या.

# प्रत्येक आगारात साजरा होणार प्रवासी राजा दिन..!

## दर सोमवारी व शुक्रवारी आयोजन: १५ जुलै पासून सुरुवात

**मुंबई :** प्रवाशांच्या समस्या, तक्रारी वजा सूचना यांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरण होण्याच्या उद्देशाने प्रत्येक आगारात (डेपो) दर सोमवारी व शुक्रवारी प्रवासी राजा दिन आयोजित करण्यात येणार आहे. या दिवशी एसटीचे जिल्हा प्रमुख म्हणजे विभाग नियंत्रक एका आगारात जाऊन प्रवाशांच्या समस्या, तक्रारी, सुचना ऐकून घेतील. त्या तातडीने सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करतील. त्यामुळे प्रवाशांचे समाधान होऊन प्रवासी सेवेचा दर्जा व गुणवत्ता वाढण्यास मदत होईल! असे मत एसटी महामंडळाचे मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी व्यक्त केले आहे.

ही अभिनव योजना १५ जुलै पासून सुरू होणार आहे. प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये यांनी आपल्या समस्या-तक्रारी, सुचना लेखी स्वरूपात दर सोमवारी व शुक्रवारी संबंधित आगारात सकाळी १० ते २ या वेळेत मांडू शकतात. त्यावर विभाग नियंत्रक तातडीने कार्यवाही करतील. प्रवासी राजा दिन कोणत्या दिवशी कोणत्या आगारात होणार आहे, याचे वेळापत्रक विभाग नियंत्रक त्या, त्या वेळी जाहीर करतील. विशेष म्हणजे प्रत्येक लेखी तक्रारीची नोंद ठेवण्यात येणार असून याबाबत काय कार्यवाही केली आहे, यावर मध्यवर्ती कार्यालय लक्ष ठेवणार आहे.

एसटीच्या विविध बसेस मधून दररोज सुमारे ५४ ते ५५ लाख प्रवाशांची सुरक्षित वाहतूक केली जाते. प्रवाशांना एसटी बसस्थानक, बसस्थानकांवरील प्रसाधनगृहे ही स्वच्छ, निर्जंतुक आणि टापटीप असावीत असे वाटते. तसेच एसटी बसेस स्वच्छ व वेळापत्रकानुसार



वेळेत मार्गस्थ व्हाव्यात, ठरलेले थांबे घ्यावेत, चालक-वाहक यांनी त्यांच्याशी सौजन्याने वागावे अशी किमान अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त केली जाते. यासंबंधित प्रवाशी तक्रारींचे निराकरण वेळेत न झाल्याने प्रवाशांना गैरसोईचा सामना करावा लागतो. या समस्यांचे निराकरण स्थानिक पातळीवर तातडीने होऊ शकते. प्रवासी सेवेचा दर्जा आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रवाशांच्या समस्यांचे वेळीच निराकरण होणे अत्यंत आवश्यक असते. तसे झाल्यास प्रवाशांना समाधानकारक सेवा देणे एसटी महामंडळाला शक्य होणार आहे. अर्थात, प्रवाशांचे महत्तम समाधान हा उद्देश ठेऊन येत्या १५ जुलै पासून प्रवासी राजा दिन या अभिनव योजनेचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी सर्व प्रवासी बंधू - भगिनींनी या योजनेचा लाभ घेऊन आपल्या समस्यांचे निराकरण करुन घ्यावे असे आवाहन एसटी महामंडळाचे मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी केले आहे.

**- (अभिजीत भोसले )**
**जनसंपर्क अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ**

## दाभोळकर स्मृति केंद्रातर्फे सहयोग निधी प्रदान कार्यक्रम

**सातारा :** रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई पाटील विद्यार्थिनी वस्तीग्रह साठी सहयोग म्हणून प्रा. कुंदा (अंबू) दाभोळकर स्मृती केंद्रातर्फे यावर्षीचा एक लाख रुपयांचा धनादेश समता दाभोळकर यांच्या हस्ते सोमवार दिनांक १५ जुलै रोजी सायंकाळी पाच वाजता लक्ष्मीबाई पाटील विद्यार्थिनी वस्तीगृहात संस्थेकडे प्रदान करण्यात येणार आहे अशी माहिती डॉ. प्रसन्न दाभोळकर यांनी दिली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई पाटील विद्यार्थिनी वस्तीगृहात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या घरातील मुली आणि वंचित समाजातील मुली राहतात व शिक्षण घेतात. या वस्तीगृहाला शासकीय अनुदान मिळत नाही. या वस्तीगृहाच्या दैनंदिन कामात सहयोग म्हणून प्रा कुंदा (अंबू) दाभोलकर स्मृति केंद्रातर्फे रयत शिक्षण संस्थेकडे एक रकमी ठेवण्यात आली असून त्यातील व्याजातून दरवर्षी सहयोग म्हणून या वस्तीगृहाला सुमारे एक लाख रुपये दिले जातील अशी रचना आहे. मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत धनादेश प्रदान करण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर वस्तीग्रहातील मुलींचे कविता वाचन, त्यांच्याशी गप्पाटप्पा आणि संध्याकाळी पावणेसात वाजता मुलींच्या बरोबर स्नेहभोजन असा कार्यक्रम आहे.

### जोशी हॉस्पिटल प्रा. लिमिटेड फलटण यांच्यावतीने

# सासकल येथिल शेतकऱ्यांना मोफत फळझाडांचे वाटप



**आदर्की :** डॉ. प्रसाद जोशी, जोशी हॉस्पिटल प्रा. लिमिटेड फलटण यांच्यावतीने सासकल, ता. फलटण येथील शेतकऱ्यांना आंबा, नारळ ही देशी फळझाडे मोफत वाटप करण्यात आली. यावेळी वृक्षारोपण बरोबरच प्रत्येकाने कमीतकमी एक झाड प्रत्तेक वर्षी लावावे आणि ते जगवावे असे आवाहन प्रसिध्द अस्थीरोग तज्ञ डॉ. प्रसाद जोशी यांनी केले. शहरी वृक्ष मानवी, पर्यावरणीय आणि आर्थिक लाभांची अफाट श्रेणी देतात. आपल्या कुटुंब, समुदाय आणि जगाच्या आरोग्यासाठी आणि कल्याणासाठी झाडे का महत्त्वाची आहेत याची माहिती प्रत्येकाने इतरांना द्यावी असेही डॉ. जोशी यांनी सांगितले. शहरी झाडांच्या फायद्यांबद्दल संशोधनासाठी तळाशी नाते जोडणे आवश्यक आहे, ही झाडे आम्ही तुम्हाला भेट देण्याची शिफारस देखील करतो. हरित शहरे व खेडी चांगले आरोग्य संशोधन शहरी वनीकरण आणि शहरी हरित संशोधनासाठी समर्पित करून वृक्ष लागवड करण्यासाठी आवाहन करण्यात आले.दरम्यान यावेळी डॉ. प्रसाद जोशी यांनी झाडे लावा झाडे जगवा ग्लोबल वॉर्मिग पासून मुक्ती मिळवा असा संदेश दिल. जागतिक कृषी दिनाचे औचित्य साधून सासकल येथे कृषी विभाग, फलटण व जोशी हॉस्पिटल प्रा. लि. फलटण यांच्या वतीने डॉ. प्रसाद जोशी यांनी १०० शेतकऱ्यांना आंबा, नारळ रोपे प्रति शेतकरी २ प्रमाणे फळझाडे वाटप करण्यात आले.

यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी फलटण सुहास रणसिंग, मुख्यधिकारी नगर परिषद फलटण निखिल मोरे, शहाजी शिंदे मंडळ कृषी अधिकारी विडणी, कृषी पर्यवेक्षक अजित सोनवलकर कृषी सहाय्यक सचिन जाधव हे उपस्थित होते. यावेळी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग, पिक विमा योजना, फळपीक विमा योजना तसेच विविध योजने विषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

डॉ प्रसाद जोशी हा स्तुत्य उपक्रम २०१३ साला पासून दर वर्षी राबवत आहेत. याप्रसंगी सासकल, परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. सामाजिक क्षेत्रातील विविध योगदानामध्ये डॉ. प्रसाद जोशी, डॉ. सौ. प्राची जोशी हे दांपत्य नेहमीच अग्रेसर असतात.

## वडगावचे निवृत प्राथमिक शिक्षक हिम्मत वामन जगताप यांचे निधन



**आदर्की :** वडगाव ता फलटण येथील निवृत प्राथमिक शिक्षक हिम्मत वामन जगताप वय ५९ यांचे अल्पशा आजाराने निधन झाले

प्राथमिक शिक्षक म्हणून १९८६ मधे रुजू झाले नंतर त्यांनी ढवळ तरडफ मांडवखडक पिराचीवाडी आदी ठिकाणी ३७ वर्ष आदर्श शिक्षक म्हणून सेवा बजावली होती. त्यानंतर शेती मधे लक्ष घालुन प्रगतशिल शेतकरी म्हणुन त्यांची परिसरात ओळख निर्माण केली होती. त्यांचे पश्चात पत्नी मुलगा मुलगी असा परिवार आहे. जिल्हा परिषद शाळा वडगावच्या प्राथमिक शिक्षिका छाया जगताप यांचे ते पती होते. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवार दि १६ रोजी वडगाव ता फलटण येथे सकाळी ९ . ३० होणार आहे.

## अनिल जेधे निधन

मसूर : मसूर ता कराड येथील श्री जटाशंकर महादेव मंदिराचे विश्वस्त व लिंगायत समाजाचे ज्येष्ठ सदस्य व सामाजिक कार्यकर्ते अनिल जगन्नाथ जेधे (सर) वय ६५ यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.प्रत्येक कार्यामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. रयत शिक्षण संस्थेमध्ये त्यांनी प्रामाणिक सेवा केली होती. त्यांचा मित्रपरिवार मोठ्या प्रमाणात होता.

# आदर्की फाटा ते वाठार फाटा सिमेंट कॉँक्रीटीकरणाचे काम प्रगतीपथावर

**आदर्की :** सातारा - फलटण रस्त्यावरील आदर्की फाटा ते वाठार फाटा रस्त्याचे काम गत वर्षी दुष्काळामुळे संथगतीने सुरू असताना पुलांची कामे मात्र वेगात सुरू होती या दरम्यान आदर्की फाटा ते आदर्की खुर्द दरम्यानचे काम शेतकर्यांनी भरपाईसाठी बंद ठेवले आहे परंतू जुन महिन्यात

पाऊस पड़ताच अत्याधुनिक मशिनरी व्दारे सिंमेट क्रॉक्रीटीकरणाचे वेगाने सुरु झालेचे चित्र दिसत आहे

सातारा - फलटण रस्त्यावरील आदर्की फाटा ते वाठार फाटा दरम्यान रस्त्याचे गती वर्षी सुरू झाले सुरुवातील या रस्त्यावरील छोटे मोठे पुलाची कामांना सुरूवात करण्यात



आली त्यानंतर दुस्काळी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे क्रॉक्रीटीकरणाचे काम संथ गतीने सुरू झाले त्या मुळे वाहन धारकांना धुळीचा त्रास सहन करावा लागला

जुन महिन्यात मोठ्या प्रमाणात पाऊसाने हजेरी लावली त्यावेळी रस्तावर चिखलामुळे वाहन धारकांना त्रास सहन करावा लागला

रात्र दिवस रस्त्यावरील अनेक वेळा चिखल बाजुला काढण्याचा प्रयत्न केला. पाण्याची उपलब्धता होताच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मशिन व्दारे सिमेंट क्रॉक्रीटीकरणाचे काम वेगाने सुरू झाले मुळे प्रवाशी वाहन धारकातुन समाधान व्यक्त होत आहे

# दोन सराईत गुन्हेगारांकडून सुमारे ३९ लाख रुपयांचे ५४ तोळे सोने हस्तगत

**सातारा :** जेष्ठ नागरिक व महिला यांच्यावर हल्ले करून चोरी करणार्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतले असून एकास अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून दरोडा, जबरी चोरीसह २६ गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. सुमारे ३९ लाख रुपयांचे ५४ तोळे सोने त्यांच्याकडून हस्तगत करण्यात आले आहे. शेख सुरेश भोसले (रा. खामगाव ता.फलटण) याच्यासह एका अल्पवयीन आरोपीस पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

दरम्यान, यात सोनारांना सोने पोहच करणारा आरोपी अद्याप फरार असून त्याचा शोध सुरु असल्याचे पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.जिल्ह्यातील विविध ठिकणी २०२३ पासून दरोडा, जबरी चोरी, घरफोडी असे प्रकार वारंवार घडत होते. यात ऑक्टोबर २३ मध्ये मालगाव ता. सातारा येथे शेतात राहत असणार्या वयोवृद्ध पती-पत्नीस जबर मारहाण करून घरावर दरोडा टाकण्यात आला होता. याप्रकरणी सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे दिला. तसेच लोणंद पोलीस ठाण्याच्या हद्दीत जून २०२४ मध्ये दोन महिलांना जबर मारहाण करून जबरी चोरी केल्याची घटना घडली होती. स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि अरुण देवकर यांना आपल्या खबर्याकडून शेख सुरेश भोसले हा या दोन्ही घटनांचा आरोपीची माहिती मिळाली. त्यांनी सपोनि सुधीर पाटील व त्यांच्या पथकाच्या मदतीने फलटण भागात सापळा लावून संशयितांवर लक्ष ठेवून सापळा रचत त्याला ताब्यात घेतले. त्याच्याबरोबर एका अल्पवयीन संशयित आरोपीसही ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून कसून चौकशी केली असता त्याने जेष्ठ नागरिक व महिला यांच्यावर हल्ले केले असल्याचे कबूल केले.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# पुणे - मिरज रेल्वेमार्गावरील आदर्की रेल्वे स्थानक सुरू करा



**आदर्की रेल्वे स्टेशन वरून पुण्या मुंबईला जाण्यासाठी चाकरमानी विदयार्थी प्रवाशी यांना जाण्यासाठी कमी खर्चात जाता येत होते विदयमान खा . रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना आदर्की रेल्वे स्थानका सदर्भात ग्रामस्थानी निवेदन दिले होते त्यांनी दुर्लक्ष केल्याने फलटण तालुक्यातील एकमेव ब्रिटीश कालीन आदर्की रेल्वे स्थानक बंद झालेने आदर्की पंचक्रोशीतुन नाराजी व्यक्त होत आहे**

**सागर जाधव,माजी ग्रामपंचायत सदस्य, आदर्की बु ।। ता फलटण**

**फलटण :** - मिरज - पुणे लोहमार्गावरील आदर्की रेल्वे स्टेशन येथे कोरोना महामारी अगोदर चार पॅसेंजर गाडयांना थांबा होता परंतु कोरोना काळात रेल्वे सेवा बंद होती ती पुर्ववत सुरु होवुन दोन वर्ष झाली तरी आदर्की रेल्वे स्टेशनवर रात्रीच्या वेळी येणारी व जाणारी एकच पॅसेंजर थांबत होती आता कोणतीही प्रवाशी गाडी थांबत नसल्याने बिट्रीश कालीन रेल्वे स्थानक स्वांतंत्र्याच्या ७५ वर्षानी बंद केल्याने आदर्की पंचक्रोशी ग्रामस्थामधुन नाराजी व्यक्त होत आहे

मिरज - पुणे लोहमार्गावर बिट्रीश काळात सालपे - वाठार स्टेशन दरम्यान आदर्की रेल्वे स्टेशन झाले त्यावेळी रस्ते नसल्याने फलटण तालुका कोरेगाव तालुक्यातील भाडळे खोरयातील दहा बारा गावे खटाव तालुक्यातील डिस्कळ परिसरातील काही गावातील पुणे - मुबई - मिरज आदी ठिकाणी नोकरी करणारे चाकरमनी प्रवाशी छोटे व्यापारी आदर्की रेल्वे स्टेशनवर उतरून बैलगाडी व्दारे किंवा चालत जात होते

१९३२ मधे संत गाडगेबाबा आदर्की रेल्वे स्टेशन येथे उतरून बिबी येथे बैलगाडीतुन गेले होते.

अशा फलटण तालुक्यातील एकमेव ब्रिट्रीशकालीन रेल्वे स्टेशनकडे स्वांतत्र्यानंतर लोकप्रधी यांनी दुर्लक्ष केले आहे. मुंबई - दिल्ली येथे जाण्यासाठी दळणवळणाची सोय नव्हती त्यावेळी विधानसभा लोकसभा अधिवेशनासाठी पश्चिम महाराष्ट्रात तील खासदार आमदार याच मार्गाने जात होते. १९७२ मीटर गेज रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेज रेल्वे मार्ग झाल्याने रेल्वे गाडयांची संख्या वाढल्याने गत तीन वर्षा पासुन रेल्वेच्या दुहेरकरणाचे काम सुरू आहे. कोरोना महामारीमुळे मिरज - पुणे लोहमार्गावरील प्रवाशी गाडया बंद करण्यात आल्या.

कोरोना महामारीनंतर गतवर्षा पासुन प्रवाशी गाडया पुर्ववत सुरु झाल्या आहेत पण आदर्की रेल्वे स्टेशनवर सकाळी सात वाजता पुण्याला जाणारी पॅसेंजर व पुण्यावरून येणारी पॅसेंजर रात्री आठ ते नऊच्या दरम्यान थांबते.

दुपारी एकरा पुण्याला जाणारी व पुण्या वरुन येणारी बाराची पॅसेजर गाडीचा थांब बंद केला आहे त्यामुळे दिवसा पॅसेजर गाडया थांबत नसल्याने आदर्की रेल्वे स्थानक गत महिन्यापासुन बंद केल्याने आदर्की पंचक्रोशीतील ग्रामस्था मधून नाराजी व्यक्त होत आहे.

# स्त्री-मुक्ती चळवळीला गांधीजींची प्रेरणा : ॲड.निशा शिवूरकर

**पुणे :** महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलाच्या वतीने आयोजित 'गांधी दर्शन' शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला. रविवार, दि. १४ जुलै २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत 'गांधी दर्शन' शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कोथरूड येथील गांधी भवनच्या दुस-या मजल्यावरील सभागृहात हे शिबीर झाले. ,एड.निशा शिवूरकर (महात्मा गांधी आणि स्त्री -पुरुष समानता),डॉ.विश्वंभर चौधरी (लोकसभा निवडणूक प्रचारातील अनुभव ),डॉ. कुमार सप्तर्षी( महात्मा गांधी आणि तत्कालीन सशस्त्र चळवळ ) या मान्यवरांनी मार्गदर्शन केले. महाराष्ट्र गांधी स्मारक निधीच्या विश्वस्त सिसिलिया कार्व्हालो या



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. ' 'गांधी दर्शन' विषयावरचे हे बारावे शिबीर होते.

अन्वर राजन, साधना दधीच,डॉ. प्रवीण सप्तर्षी, डॉ.मच्छिंद्र गोरडे,सुदर्शन चखाले,एड.स्वप्नील तोंडे , नितिन सोनवणे,आप्पा अनारसे, रोहन गायकवाड , लावण्या तोंडे आदी उपस्थित होते. जपान मधून आलेल्या बौद्ध भंते यांनीही संबोधित केले. सुरुवातीला संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

ॲड. निशा शिवूरकर म्हणाल्या, 'गांधी विचाराचे आश्रम आणि कार्य महाराष्ट्रात आहेत. गांधीजी हे देखील समतेच्या विचारांची प्रेरणा आहे.गांधीजींमुळें स्त्रिया स्वातंत्र्य चळवळीत आल्या. त्याहीपुढे स्त्री मुक्तीच्या चळवळीत त्यांचे मोठे योगदान आहे.धर्मग्रंथांच्या निर्मितीत स्त्रीयांचा सहभाग नाही, मात्र, त्यांच्या अंमलबजावणीची सक्ती मात्र त्यांच्यावर टाकण्यात आली. हे म.फुले आणि म. गांधीजी या दोघांनीही म्हटलेले आहे.गांधीजींनी स्त्रियांना अबला मानत नाहीत. त्यांनी स्त्रियांचा प्रश्न उपेक्षितांच्या प्रश्नाशी जोडला.समतेचे टोक गाठायचे असेल तर लिंगभेद, वर्णभेद यांच्या पलीकडे जाऊन भेदाभेद मिटवले पाहिजेत. गांधीजींनी स्त्रियांमध्ये चैतन्य निर्माण केले, कारण स्त्रियांचे प्रश्न गांधी जी सर्वंकषपणे पाहत होते.माझा यज्ञ स्त्रियांच्या सहभागाशिवाय अपूर्ण आहे, असे ते म्हणत. स्त्रियांना सर्वत्र भिऊन वागावे लागते, या भयापासून मुक्ती म्हणजे स्वातंत्र्य असे गांधीजी मानत. सत्याग्रही निर्भय स्त्री अशी ओळख स्वातंत्र्यलढयात मिळाली. देश स्वतंत्र करणे आणि स्त्रियांची दास्यातून सुटका करणे हे एकाच वेळी करण्याचे काम आहे, याविषयी गांधीजींच्या मनात शंका नाही. आज मात्र, चंगळवाद वाढत असून वास्तवापासून, समस्यांपासून दूर नेत आहे, असेही निरीक्षण ॲड. शिवूरकर यांनी मांडले.लग्नाचे वय, विवाह, साधी विवाह पध्दती, आंतरजातीय विवाह याबाबत गांधीजींच्या प्रागतिक मतांची माहितीही त्यांनी दिली. नवरा बायको तील मैत्र भाव ही गांधींनी जगाला दिलेली देणगी आहे. आज प्रतिगामी विचारांच्या प्रभावाने स्त्रियांवर अत्याचार होताना दिसत आहेत.अशावेळी पुन्हा गांधीजींच्या महिला सक्षमीकरणाच्या विचारांचे जागरण केले पाहिजे', असेही त्यांनी सांगितले .

# डिजिटल साधनांचा वापरताना डोळ्याची सुरक्षितता आवश्यक : डॉ. तात्याराव लहाने

## रोटरी क्लब ऑफ कराड चा पदग्रहण सोहळा उत्साहातः रोटरी कला प्रदर्शनाचे उद्घाटन

**कराड :** बदलत्या युगामध्ये आणि धावत्या जगामध्ये आपण डिजिटल तंत्रज्ञानाच्या आहारी गेलो आहोत. डिजिटल तंत्रज्ञान जितके फायदेशीर आहे, तितकेच योग्य काळजी न घेतल्यास ते घातक ही आहे. विशेषतः या डिजिटल साधनांचा वापर करताना डोळ्याची सुरक्षितता जपणे आवश्यक असल्याचे प्रसिद्ध नेत्रतज्ञ पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनी सांगितले.





स्व.यशवंतराव चव्हाण स्मृतीसदन (टाऊन हॉल) येथे रोटरी क्लब ऑफ कराड चा ६८ वा पदग्रहण सोहळा तसेच रोटरॅक्ट क्लब ऑफ कराड सिटी चा पदग्रहण सोहळा व रो.डॉ.अस्मिता फासे निर्मित प्रतिबिंब रोटरी कला प्रदर्शनाचे उद्घाटन अशा संयुक्त कार्यक्रमात ते डिजिटल साधनांचा वापर व डोळ्यांचे आरोग्य या विषयावरती बोलत होते. या कार्यक्रमास असिस्टंट गव्हर्नर रो. राजीव रावळ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रोटरी क्लब ऑफ कराड चे नूतन प्रेसिडेंट रो.रामचंद्र लाखोले यांनी मावळते प्रेसिडेंट रो.बद्रीनाथ धस्के यांच्याकडून पदभार स्वीकारला. नूतन सेक्रेटरी रो.आनंदा थोरात यांनी मावळते सेक्रेटरी रो. शिवराज माने यांच्याकडून पदभार स्वीकारला. यावेळी रोटरी क्लब ऑफ कराडचे सर्व डायरेक्टर यांनीही पदभार स्वीकारला. या कार्यक्रमांमध्ये रोटरॅक्ट क्लब ऑफ कराड सिटी प्रेसिडेंट रो.अजीम कागदी, सेक्रेटरी रो. प्रथमेश कांबळे व संचालक मंडळाने आपला पदभार स्वीकारला.

आपल्या संघर्षपूर्ण जीवन प्रवासाची केलेली वाटचाल सांगताना संकटावरती मात करूनच आपण यशस्वी होतो असे सांगत डॉ.लहाने म्हणाले, आपण संकटे आणि समस्या याचा बाऊ न करता त्याला सामोरे जाण्यासाठी प्रयत्न केला तर नक्कीच आपण आयुष्यामध्ये यशस्वी होऊ शकतो. आज मोबाईल आणि संगणक याचा वापर करताना सुरक्षितता न बाळगल्याने अनेक गंभीर आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. संगणक असो किंवा मोबाईल असो याचा वापर करताना आपण किमान ४५ सेंटीमीटर अंतर ठेवणे गरजेचे आहे. डोळ्यांच्या पापण्यांची ठराविक वेळेत उघड झाप झाली पाहिजे. गरज असेल तरच मोबाईलचा वापर करावा. मोबाईल असो किंवा अन्य डिजिटल साधने यांच्या असणाऱ्या लहरी याचा परिणाम ही आपल्या आरोग्यावरती होत असतो, त्यामुळे आपण योग्य ती काळजी घेणे, हे आपल्या आरोग्य हिताचे आहे.

कार्यक्रमात असिस्टंट गव्हर्नर रो. राजीव रावळ यांनी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो.डॉ.सुरेश साबू यांचा संदेश सांगत रोटरी क्लब ऑफ कराडचे आणि त्यांनी निर्माण केलेल्या विविध क्लबचे काम प्रेरणादायी असल्याचे सांगतच येथे केलेले प्रकल्प हे दिशादर्शक असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात रो.बद्रीनाथ धस्के यांनी गतवर्षात केलेल्या प्रकल्पांची माहिती दिली. प्रेसिडेंट रामचंद्र लाखोले यांनी चालू वर्षात राबवण्यात येणाऱ्या उपक्रम व कार्यक्रमाची माहिती देत सर्वांच्या सहकार्याने चांगले काम उभारण्यात येणार असल्याचे सांगितले. रो.जयंत जगताप यांनी अमेरिकेतील शिकागो येथील रोटरी इंटरनॅशनल ऑफिसला भेट दिल्यानंतर मिळालेला अनुभव आणि पाहिलेल्या कामाची माहिती देत जगभरात सुरू असलेल्या कामांची माहिती जवळून पाहता आल्याचे सांगितले.

यावेळी पॉल हॅरीस झालेल्या रोटरीयन मेंबरचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर वाहगाव येथील दिव्यांग व कर्णबधिर मुलीला कानातील अत्याधुनिक मशीन देण्यात आले. मधुमेह प्रोजेक्ट करत असलेल्या कामाबद्दल डॉ.राहुल फासे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते रोटरी क्लब ऑफ कराडचे सन्माननीय सभासद म्हणून अरुण पाटील व डॉ.अनिल देसाई यांना पत्र देऊन सत्कार करण्यात आला. माजी खासदार श्रीनिवास पाटील व माजी मुख्यमंत्री आ.पृथ्वीराज चव्हाण यांनी ही पदग्रहण सोहळास शुभेच्छा दिल्या. सेक्रेटरी रो.आनंदा थोरात यांनी आभार मानले.

# साताऱ्याची 'लाडकी बहीण' ऑनलाईन नोंदणीत सर्वप्रथम

**कराड :** 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत ५५ हजार ५५७ ऑनलाईन नोंदणी करून, सातारा जिल्हा प्रशासनने राज्यात अव्वलस्थान पटकावले. तर, ऑनलाईन, ऑफलाईन अशा एकूण नोंदणीत दुसऱ्या स्थानावर राहत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जिल्हा त्यांच्या महत्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीत सर्वात अग्रेसर असल्याचे दाखवून दिले आहे.

महायुती सरकारने महिलांच्या आर्थिक सक्षमतेसाठी पात्र महिलेला दरमहा दीड हजार देणारी ही योजना जाहीर करून, कमी कालावधीत प्रचंड नोंदणीचे शिवधनुष्य उचलले आहे. त्यात सातारा जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा स्वयंसेविका, तलाठी, कोतवाल आणि ग्रामसेवक यांच्याकडून नियोजनबद्ध पद्धतीने आणि प्रचंड ताकदीने 'लाडकी बहीण'च्या नोंदणीचा कार्यक्रम राबवला जात आहे.

पालकमंत्री शंभूराज देसाई, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या निर्देशानुसार आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, महिला - बालकल्याण विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी रोहिणी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली या नोंदणीचे काम युद्धापातळीवर सुरु आहे. त्यात पात्र महिला कुठे भेटतील, त्यांचे अर्ज कुठे भरणे शक्य होईल, निर्धारित वेळेपूर्वी नोंदणीचे उद्दिष्ट कसे पूर्ण करता येईल यांचे अभ्यासाअंती नियोजन झाल्याने सातारा जिल्हा प्रशासन या कामात सर्वात पुढे राहिले आहे.

सध्या खरीप पेरण्यांमुळे सकाळी लवकर किंवा रात्री उशिरा संबंधित महिलेला भेटणे शक्य झाले नाहीतर तिला अगदी पावसाचा मारा आणि चिखलातून वाट काढून भेटत प्रशासनाच्या प्रतिनिधींनी नोंदण्या केल्या आहेत. ऑनलाईन पद्धतीने ५५ हजार ५५७ नोंदणी करून, जिल्ह्याने राज्यात प्रथम तर, ऑनलाईन व ऑफलाईन अशा एकूण नोंदणीत दुसरा क्रमांक मिळवल्याने 'लाडकी बहीण' योजनेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जिल्ह्याची मान उंचावली आहे. नोंदणीची कालमर्यादा ३१ ऑगस्टपर्यंत असून, तत्पूर्वी नोंदणी मोहीम यशस्वी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाची हातघाई दिसते आहे.

# ॲड. दादासाहेब चव्हाण फार्मसी महाविद्यालयास आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र मंजूर

**मसूर :** महाराष्ट्र शासन संचलित जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सातारा. ॲड. दादासाहेब चव्हाण विद्यासंकुल माळवाडी, मसूर मधील फार्मसी महाविदयालय यांच्यात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना मोफत कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी हा सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सातारा व जिल्हा कौशल्य विकास रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहा. आयुक्त सुनील पवार यांच्या उपस्थितीत महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र सुरू करण्याबाबत वर्क ऑर्डर कॅम्पस डायरेक्टर, प्राचार्य विक्रम शिंदे यांना सुपूर्त करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष दिलीप चव्हाण, सचिव अमित चव्हाण, संचालिका अरुणा चव्हाण, डॉ.वृषाली चव्हाण, व्यंकट पाटील, मोहन चव्हाण, आत्माराम घोलवडे यांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले. यासाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार मार्गदर्शन केंद्र सातारा, अमर माने व प्रकाश महाडिक यांचे सहकार्य मिळाले.

# शरीर सक्षम ठेवने ही आजच्या काळाची गरज बनली आहे : सुनील माने

**कोरेगाव :** आजच्या धकाधकीच्या जीवनात शारिरीक स्वास्थ्य राखणे ही सर्वात महत्त्वाची गरज आहे. यासाठी सर्वांनी आपली तपासणी करून घेणे गरजेचे आहे शरीर सक्षम ठेवणे ही आजच्या काळाची गरज आहे असे प्रतिपादन सातारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हाध्यक्ष सुनिल माने यांनी केले. ते रहिमतपूर येथील वीरशैव मठात रहिमतपूर नगरपालिकेच्या वतीने आयोजित केलेल्या आरोग्य शिबीराच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी बोलत होते.

रहिमतपूर येथील श्री वीरशैव लिंगायत मठ येथे आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबिराचे उद्घाटन सातारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष सुनील माने, कोरेगांव तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष शहाजीराव क्षिरसागर, माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदा कोरे,



सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे संचालक अविनाश माने, माजी नगराध्यक्ष भानुदास भोसले, यांच्या प्रमुख उपस्थितीत फित कापून करण्यात आले.

या शिबीरामध्ये हृदयरोग इलेक्ट्रो कार्डिओग्राम (एउत्र्ह), उच्च रक्तदाब, मधुमेह रक्तातील साखर तपासणी, साखर वाढीमुळे होणारे आजार, नेत्र तपासणी व मोफत चष्मा वाटप, व पुणे येथिल नामांकित रुग्णालयात मोफत मोतीबिंदू ऑपरेशन, कॅन्सर संदर्भात तपासणी व मार्गदर्शन, तसेच स्त्री रोगावरील मार्गदर्शन व प्रथमोपचार, महात्मा जोतिबा फुले योजनेअंतर्गत मोफत ऑपरेशन सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

याप्रसंगी बेदील माने, शशिकांत भोसले, विद्याधर बाजारे, विक्रम माने, सतीश भोसले, दिलीप कदम, शिवाजी माने, हिम्मत माने, असिफ डांगे, शशिकांत माने, अविनाश कदम, भागवत घाडगे, शिवदास माने, तानाजी राऊत, विक्रम माने, शेखर पाटणे, इसाक मुल्ला, सुनील श्रीमंत माने, मोरे बापू, अनिल माने (आबा), जगदीश गायकवाड, ननावरे सर, शिवाजीराव साळुंखे, शंकर पवार, सुनिल क्षीरसागर तसेच शिबिरार्थी व सह्याद्रि हॉस्पिटलचे तज्ञ वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

# शासन आपल्या दारी अभियानाचा गरजूनी लाभ घ्यावा : बाई माने

**वडूज :** खटाव तालुक्यातील प्रशासनाच्या वतीने नागरिकांना शासनाच्या विविध योजना उपलब्ध करून देण्यासाठी तालुक्यातील ११ ठिकाणी मंडल निहाय सोमवार दिनांक १५ ते ३० जुलै या कालावधीत शासन आपल्या दारी अभियान राबविण्यात येत असून या अभियानाचा गरजू नागरिकांनी लाभ घेण्याचं आवाहन तहसीलदार बाई माने यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केलं आहे.

या अभियानात सकाळी दहा ते दुपारी चार या वेळेत केंद्र व राज्य च सरकारच्या सेवा-योजनांची माहिती नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याच बरोबर विविध प्रकारचे आवश्यक दाखले देण्यात येणार आहेत.

पुसेगाव मंडल- सोमवार, दि. १५, औंध मंडल- मंगळवार, दि. १६, खटाव- गुरुवार, दि. १८, पुसेसावळी- शुक्रवार, दि. १९, कातरखटाव- सोमवार, दि. २२, बुध- मंगळवार, दि. २३, कलेढोण- बुधवार, दि. २४, वडूज- गुरुवार, दि. २५, मायणी-शुक्रवार, दि. २६, भोसरे -सोमवार, दि. २९ तर निमसोड मंडलात मंगळवार, दि. ३० जुलै अखेर त्या मंडलातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत हे अभियान आयोजित करण्यात आलं आहे.

यामध्ये गरजुंना संजय गांधी योजना, श्रावण बाळ योजना, शिधापत्रिका, आधार कार्ड, लाडकी बहीण योजना, जातीचे दाखले, नॉन क्रिमिलेअर, उत्पन्न दाखले, डोमीसांइल, शेतकरी, अल्पभूधारक, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, रहिवासी दाखला, डोंगरी दाखला, सातबारा दुरुस्ती व वारस नोंदी आदी दाखले देण्यात येणार आहेत. नागरिकांनी अभियानाचा लाभ घेण्याचं आवाहन तहसीलदार माने यांनी केलं आहे.

# भक्तीमय वातावरणात रंगली संत गाथा

## भारतीय विद्या भवन,इन्फोसिस फाऊंडेशनचा सांस्कृतिक प्रसार उपक्रम

**पुणे :** भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत ' कथक पाठशाला ' आयोजित 'संत गाथा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.संत काव्यावर आधारीत शास्त्रीय नृत्यरचना यावेळी सादर करण्यात आल्या. ' संत गाथा ' या कार्यक्रमात १६ नृत्य संस्थांनी आपले नृत्य सादरीकरण केले. संत साहित्यावर अतिशय नाविन्यपूर्ण रचना आणि नृत्यप्रकार सर्व कलाकारांनी



सादर करून रसिकांची मने जिंकली. रविवार,१४ जुलै रोजी सायंकाळी साडे पाच वाजता हा कार्यक्रम भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह,(सेनापती बापट रस्ता) येथे झाला.रसिकांना तो विनामूल्य खुला होता.

भारतीय विद्या भवनचे मानद सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे , डॉ. निलीमा देशपांडे -हिरवे , कथक पाठशालेच्या संस्थापक नेहा मुथियान आदी मान्यवर उपस्थित होते. श्वेता राजोपाध्ये , ऋचा ढेकणे यांनी निवेदन केले.भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत सादर होणारा हा २१८ वा कार्यक्रम होता.

# स्फूर्ती विद्यामंदिर नगरपालिका शाळेची साताऱ्यात माऊलींची दिंडी

## रिमझिम त्या पावसात चिमुकल्या वारकऱ्यांचा सहभाग

**सातारा :** सातारा नगरपालिकेच्या स्फूर्ती विद्या मंदिर शाळा क्रमांक आठ गुरुवार पेठ येथील शाळा व्यवस्थापनाच्या वतीने चिमुकल्या विद्यार्थ्यांची साताऱ्यातून दिंडी काढण्यात आली .खांद्यावर छोट्या पताका आता टाळ मृदुंग आणि पारंपारिक वारकऱ्यांच्या वेशातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी ज्ञानबा माऊलीच्या नावाचा जयघोष करत शहरातून माऊलींची दिंडी काढली . त्या पावसातली दिंडी हे मनोहरी दृश्य सातारकरांनी अनुभवले

आषाढी एकादशीला संत संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांच्या पालख्या १७ जुलै रोजी पंढरपूर मध्ये पोहोचत आहे. आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर साताऱ्यातील विविध शाळांनी ज्ञानेश्वर माऊलींची दिंडी काढली होती. सातारा नगरपालिकेच्या स्फूर्ती विद्यामंदिर शाळा क्रमांक आठ येथील शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वारीचा अनुभव दिला .वारकऱ्यांच्या विषयातील सुमारे शंभरहून अधिक विद्यार्थी या वारी सहभागी झाले होते छोट्याशा चिमुकल्या पालखीमध्ये विठ्ठल रुक्मिणीच्या प्रतिमेस सजवण्यात आले होते त्याची पूजा माली नगराध्यक्ष सुजाता राजेमहाडिक नगरपालिका शिक्षण मंडळाच्या जयश्री इंगळे व मुख्याध्यापिका सुनीता कांबळे यावेळी उपस्थित होत्या. या दिडीमध्ये विठ्ठलाची वेशभूषा केलेल्या विद्यार्थ्याने लक्ष वेधून घेतले.

ही दिंडी शाळा परिसरातून निघाली तेथून कमानी हौद मार्गे देवी चौक देवी चौकातून फिरून हॉटेल आम्रपाली मार्गे पुन्हा गुरुवार पेठ परिसरातील शाळेकडे नेण्यात आली .रिमझिमत्या पावसामध्ये चिमुकल्यांच्या निघालेल्या दिंडीचे सातारकरांनी तोंड भरून कौतुक केले .प्रत्यक्ष ज्ञानेश्वर माऊलींची वारी काय असते हे विद्यार्थ्यांना कळावे आणि भारतीय संस्कृतीच्या त्यातल्या त्यात महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायाचा वारसा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावा आणि अध्यात्म विषयी विद्यार्थ्यांमध्ये एक बांधिलकी तयार व्हावी याकरिता ही वारी काढण्यात आल्याचे शाळा व्यवस्थापनाच्या वतीने सांगण्यात आले.

# भाजप कार्यालयात झळकले दोन्ही राजांचे फोटो

## अंतस्थ वादावादीच्या पार्श्वभूमीवर डॅमेज कंट्रोलचा प्रयत्न ?

**सातारा :** भारतीय जनता पार्टीच्या सातारा जिल्हा कार्यालयांमध्ये खासदार उदयनराजे भोसले व आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे फोटो झळकले आहेत .भाजपचे जिल्हा सरचिटणीस संतोष कणसे यांच्या पुढाकाराने हे फोटो झळकल्याची चर्चा आहे . उदयनराजे समर्थक व धैर्यशील कदम यांच्यामध्ये उभा वाद पेटलेला असताना जिल्हा भाजप एकसंघ दाखवण्याची राजकीय खटपट सुरू झाली आहे.

माणचे आमदार जयकुमार गोरे हे जिल्हाध्यक्ष असताना विसावा नाका येथे सातारा जिल्हा भाजपचे विस्तारित कार्यालय सुरू करण्यात आले .या कार्यालयात पंतप्रधान नरेंद्र मोदी राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्ढा, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे स्वतः जयकुमार गोरे यांची छायाचित्रे कार्यालयात झळकवण्यात आली होती .हे कार्यालय जयकुमार गोरे यांच्या पुढाकाराने झाल्यामुळे त्यांच्या निर्देशाप्रमाणे कार्यालयाची सजावट करण्यात आली होती .सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष अनिल देसाई व आमदार जयकुमार गोरे यांच्यात राजकीय वाद पेटलेला आहे .त्यावेळी उदयनराजे यांना तिकीट दिले जाऊ नये याकरिता जयकुमार गोरे यांनी उदयनराजे विरोधी भूमिका घेतल्याचा गौप्यस्फोट केला होता .धैर्यशील कदम यांनी उदयनराजे समर्थकांचा बगलबच्चे असा उल्लेख केल्याने तीव्र नाराजी पसरली .भाजपचे राज्य उपाध्यक्ष प्रवीण धस्के यांनी पत्रक काढून या प्रकाराचा निषेध केला होता .जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत पत्रकारांनी कार्यालयात खासदार उदयनराजे भोसले व आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे छायाचित्रे का नाहीत ? असा सवाल केला असता त्यांनी या कार्यालयात मी कोणताही बदल केला नाही कार्यालयाची सजावट ही आमदार जयकुमार गोरे यांच्या काळातील आहे असे उत्तर दिले होते.





२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत उदयनराजे भोसले यांनी आश्चर्यकारकरीत्या विजय खेचून आणला होता .त्यामध्ये आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मोठी भूमिका बजावली त्यामुळे भाजपच्या कार्यालयात या दोघांचेही फोटो नाहीत अशी सल राजे समर्थकांना जाचत होती. उदयनराजे समर्थक व धैर्यशील कदम यांच्यातील राजकीय नाराजी संपलेली नाही असे असताना शुक्रवारी जिल्हा सरचिटणीस संतोष कणसे यांच्या पुढाकाराने कार्यालयांमध्ये खासदार उदयनराजे भोसले व आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची छायाचित्रे झळकली .त्याची छायाचित्रे सोशल मिडियावर प्रदर्शित झाल्यावर भाजपच्या वरिष्ठांकडून डॅमेज कंट्रोल चे निरोप आले की काय ? अशी विचारणा होऊ लागली होती.

विधानसभा निवडणुकांच्या दृष्टीने भाजपने जोरदार सातारा जिल्ह्यात तयारी सुरू केली आहे कोठेही अंतर्गत वाद दूर किंवा राजकीय हेवेदावे असू नयेत असे प्रदेश कार्यकारिणीचे निर्देश आहेत असे असताना धैर्यशील कदमच राजे गटाच्या रडारवर आल्यामुळे धुसफुस संपायला तयार नाही . खासदार उदयनराजे भोसले साताऱ्यात आल्यानंतर आगामी काळात काय राजकीय हालचाली होणार याची प्रचंड उत्सुकता आहे.

# खंबाटकी घाटात ऑईल गळतीमुळे अकरा तास वाहतुक संथ गतीने



**खंडाळा** : पुणे-सातारा महामार्गावरील खंबाटकी घाटात पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास महामार्गाच्या रस्त्यावर ऑईल सांडल्याने शेकडो वाहनांची घसरगुंडी झाली.मात्र,सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. परंतु,यामध्ये वाहनांचे किरकोळ नुकसान झाले आहे.महामार्ग पोलीस,खंडाळा पोलीसांनी तब्बल अकरा तास मेहनत घेत रस्त्यावरील वाहतुक सुरळीत केली .

याबाबत अधिक माहिती अशी की, शनिवारी पहाटे खांबाटकी घाटातील भैरवनाथ मंदिराजवळ असणाऱ्या वळणावर एका गाडीचे ऑइल किमान शंभर मीटर अंतर गळती होऊन रस्त्यावर पसरले होते.यामुळे या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. ऑईलवरून दुचाकी,चारचाकी गाड्या घसरून कठड्यास धडकल्या.यात अनेक वाहनांचे किरकोळ नुकसान झाले.मात्र, कसलीही जीवितहानी झाली नाही.

दरम्यान,महामार्ग पोलीस व खंडाळा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन एका लेनने वाहतूक सुरू केली. या घाटात सकाळपासून सिंगल लेन वाहतूक सुरळीतपणे सुरू होती. मात्र शनिवार,रविवार सुट्ट्या असल्याने रस्त्यावर वाहनांची मोठी गर्दी होती . शनिवारी सकाळी खंडाळा शहरातील टँकर व अग्निशामक यंत्रणेच्या सहाय्याने रस्त्यावर पाणी मारण्यात आले. मात्र, तरीही रस्ता निसरडाच राहिला आहे. यानंतर दुपारी या महामार्गावर जेसीबी व ट्रॅक्टरच्या मदतीने माती टाकून रस्ता साफ करण्याचे काम सुरू केले. दुपारी दोन वाजेपर्यंत रस्त्यावरील ऑईलचा थर काढण्यात यश आले. यासाठी खंडाळा पोलीस व महामार्ग पोलिसांनी मोठी मेहनत घेतली. महामार्ग प्राधिकरणाने बॅरिकेटस उपलब्ध करून दिले. वाई नगरपरिषद व एशियन पेंटस कंपनीने अग्निशमन बंब उपलब्ध करून दिले.

# महाबळेश्वर तालुक्यातील येरणे बु. व येरणे खु. गावासाठी ३ कोटी ४९ लाखाची संरक्षक भिंती मंजुर

**वाई :** जुलै २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सोळशी नदीला प्रचंड मोठा पूर आला होता.या पुराने सोळशी नदीच्या डाव्या तीरावर वसलेल्या येरणे बुद्रुक व येरणे खु. या गावातील मंदिरातील तसेच शेतजमिनीचे अपरिमित नुकसान झाले होते. नदीपात्रात फार मोठ्या प्रमाणात दगड गोटे येऊन पात्र उथळ झाल्याने दरवर्षी पूरपरिस्थिती निर्माण होते.यामुळे।सार्वजनिक मालमत्तेचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान होते. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यात आ.मकरंद पाटील यांना यश आले आहे. जलसंपदा विभागाअंतर्गत महाराषष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाकडुन या गावातील सोळशी नदीकाठी दोन संरक्षण भिंत उभारण्याच्या आ.पाटील यांच्या मागणीला यश आले असून तब्बल ३ कोटी ४९ लाख रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाली आहे.

या मागणीवरून प्रस्तावित ठिकाणी जलसंपदा विभाग कार्यालयाने प्रत्यक्ष पाहणी करून पूर संरक्षक भिंतीच्या कामाचे अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात केले होते. गावाच्या पुरहानीच्या समस्येवर कायमस्वरुपी तोडगा काढणेसाठी आ.मकरंद पाटील यांनी शासन दरबारी सततचा पाठपुरावा केल्याने येरणे बुद्रुक व येरणे खु. येथील सोळशी नदीकाठी पूर संरक्षक भिंत बांधकामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळून ३ कोटी ४९ लाख एवढया खर्चाला मंजुरी मिळाली आहे.या संरक्षक भिंतीमुळे येरणे बुद्रुक व येरणे खु. गावाची पुराच्या पाण्याच्या भिती पासून सुटका होणार आहे. लोकांच्या अडचणी,समस्यावर तोडगा काढण्यास आ.पाटील यशस्वी झाल्याने त्यांच्या कार्यकुशलतेबद्दल कौतुक होत आहे.

# शरीर सक्षम ठेवने ही आजच्या काळाची गरज बनली आहे : सुनील माने

**कोरेगाव** : आजच्या धकाधकीच्या जीवनात शारिरीक स्वास्थ्य राखणे ही सर्वात महत्त्वाची गरज आहे. यासाठी सर्वांनी आपली तपासणी करून घेणे गरजेचे आहे शरीर सक्षम ठेवणे ही आजच्या काळाची गरज आहे असे प्रतिपादन सातारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हाध्यक्ष सुनिल माने यांनी केले. ते रहिमतपूर येथील वीरशैव मठात रहिमतपूर नगरपालिकेच्या वतीने आयोजित केलेल्या आरोग्य शिबीराच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी बोलत होते.

रहिमतपूर येथील श्री वीरशैव लिंगायत मठ येथे आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबिराचे उद्घाटन सातारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष सुनील माने, कोरेगांव तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष शहाजीराव क्षिरसागर, माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदा कोरे, सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे संचालक अविनाश माने, माजी नगराध्यक्ष भानुदास भोसले, यांच्या प्रमुख उपस्थितीत फित कापून करण्यात आले.

या शिबीरामध्ये हृदयरोग इलेक्ट्रो कार्डिओग्राम (एउऋ), उच्च रक्तदाब, मधुमेह रक्तातील साखर तपासणी, साखर वाढीमुळे होणारे आजार, नेत्र तपासणी व मोफत चष्मा वाटप, व पुणे येथिल नामांकित रुग्णालयात मोफत मोतीबिंदू ऑपरेशन, कॅन्सर संदर्भात तपासणी व मार्गदर्शन, तसेच स्त्री रोगावरील मार्गदर्शन व प्रथमोपचार, महात्मा जोतिबा फुले योजनेअंतर्गत मोफत ऑपरेशन सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. याप्रसंगी बेदील माने, शशिकांत भोसले, विद्याधर बाजारे, विक्रम माने, सतीश भोसले, दिलीप कदम, शिवाजी माने, हिम्मत माने, असिफ डांगे, शशिकांत माने, अविनाश कदम, भागवत घाडगे, शिवदास माने, तानाजी राऊत, विक्रम माने, शेखर पाटणे, इसाक मुल्ला, सुनील श्रीमंत माने, मोरे बापू, अनिल माने (आबा), जगदीश गायकवाड, ननावरे सर, शिवाजीराव साळुंखे, शंकर पवार, सुनिल क्षीरसागर तसेच शिबिरार्थी व सह्याद्रि हॉस्पिटलचे तज्ञ वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

# शासनाची मोफत व्यवसायिक शिक्षणप्रणाली मुलींना ठरणार लाभदायक

**सातारा** : महाराष्ट्र राज्याचे शिक्षण क्षेत्र अधिक गतिमान करून राज्याबरोबर राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमाची मुलीना मोफत प्रवेशाच्या अंमलबजावणीचा ऐतिहासिक व धोरणात्मक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे राज्यातील दिनदुबल्या सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास इतर मागास या प्रवर्गातील मुलींना नियम व अटीच्या अजून राहून मोफत व्यावसायिक शिक्षणाची ज्ञानगंगा आता घराघरात पोचणार आहे या ऐतिहासिक निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे रंजल्या गांजल्या दीनदुबळ्या व वंचित मुलींचे जीवन यामुळे प्रकाशमय होणार आहे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रात झालेली नवक्रांती व या मधून घडलेला बदल पाहता व्यवसायिक शिक्षण हे प्रत्येक समाज घटकाना मिळाले पाहिजे हा दृष्टिकोन ठेवून महाराष्ट्र राज्य सरकारने घेतलेला निर्णय हा ऐतिहासिक ठरला आहे याविषयी गौरीशंकरचे जनसंपर्क अधिकारी श्रीरंग काटेकर सातारा यांचा विशेष लेख.

महिला सक्षमीकरणाबरोबरच व्यवसायिक शिक्षणातून मुलींनी स्वतः ची सर्वांगीण प्रगती करावी हे प्रमुख उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्र शासनाने शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ पासून राज्यातील अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयात (खाजगी अभिमत विघापीठे/ स्वयं अर्थ सहाय्यित विदयापीठे वगळून) व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (ई डब्लु एस) सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्ग (एस ई बी सी) तसेच इतर मागासवर्ग (ओबीसी) या प्रवर्गातील मुलींना मोफत शिक्षणाबरोबरच शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५०% ऐवजी १००% लाभ देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्य सरकारच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे राज्यातील मुलींमध्ये उत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे व्यावसायिक शिक्षण शिकेल तोच स्पर्धात्मक स्पर्धेत टिकेल याची जाणीव राज्य सरकारला झाल्याने या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली. शासन निर्णय क्र. शिष्यवृत्ती २०२४ /प्र. क्र १०५/ नांशि ४ दिनांक ८ जुलै २०२४ च्या जीआर नुसार याची अंमलबजावणीचे आदेश राज्यातील संबंधित महाविद्यालयांना देण्यात आले आहे यामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभाग ,वैद्यकीय शिक्षण, औषध निर्माण शास्त्र, कृषी व पशुसंवर्धन व्यवसाय विकास तसेच मत्स्य व्यवसाय विभागाच्या नियंत्रणाखाली येणाऱ्या शैक्षणिक संस्थेद्वारे राबविण्यात येणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश घेणाऱ्या इतर मागास (ओबीसी) आर्थिक दृष्ट्या दुर्बल (ई डब्ल्यू एस) आणि सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास (एस ई बी सी)या प्रवर्गातील ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये आठ लाख पेक्षा कमीअसलेल्या पात्र पालकांच्या पाल्यांना याचा लाभ घेता येणार आहे.

**ईडब्ल्यूएस आरक्षणातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेताना ई डब्ल्यू एस प्रमाणपत्र ऐवजी (आई वडील दोन्ही) पालकांचे एकत्रित उत्पन्नावर आधारित सक्षम अधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाईल तथापि विद्यार्थी नोकरीत असतील तर त्यांच्या आई-वडील यांच्या उत्पन्नासोबत विद्यार्थ्यांचे उत्पन्न प्रमाणपत्र साठी विचारात घेण्यात येईल.**

**ई डब्ल्यू एस आरक्षणातून शैक्षणिक प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांस राजश्री शाहू छत्रपती महाराज शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ प्रथम वर्षाकरिता मिळाल्यानंतर ही सवलत त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत मिळणार आहे विद्यार्थिनींना दुसऱ्या वर्षापासून दरवर्षी उत्पन्न सादर करायची गरज भासणार नाही.**

**- श्रीरंग काटेकर, जनसंपर्क अधिकारी गौरीशंकर नॉलेज सिटी**

# खंडपीठासंदर्भात लवकर बैठक घ्या : खा. शाहू महाराज यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र

**कोल्हापूर** : मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापुरात होण्याबाबत सहा जिल्ह्यांतील जनतेच्या भावना तीव्र आहेत. त्यासाठी वेळोवेळी निदर्शन, मोर्चे, कोर्ट कामकाज बंद आंदालने झाली आहेत. परिणामी, खंडपीठ स्थापनेकडे गांभीयनि लक्ष देणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने आपण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कोल्हापूर खंडपीठ कृती समिती यांची बैठक लवकरात लवकर घ्यावी, असे पत्र खा. शाहू महाराज यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठविले.

कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या सहा जिल्ह्यांसाठी खंडपीठ तथा सर्किट बेंच स्थापन करण्याची गेल्या ३८ वर्षांपासून मागणी आहे. अद्याप ती मागणी प्रलंबित आहे. ७ सप्टेंबर २०१५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती मोहित शहा यांनी कोल्हापुरात मुंबई उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच स्थापन - करण्याबाबत अहवाल दिल्याचे समजते. तसेच कोल्हापूर खंडपीठ कृती समिती व मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यांची - बैठक झाली होती. त्यावेळी

# स्फूर्ती विद्यामंदिर नगरपालिका शाळेची साताऱ्यात माऊलींची दिंडी

## रिमझिम त्या पावसात चिमुकल्या वारकऱ्यांचा सहभाग

**सातारा :** सातारा नगरपालिकेच्या स्फूर्ती विद्या मंदिर शाळा क्रमांक आठ गुरुवार पेठ येथील शाळा व्यवस्थापनाच्या वतीने चिमुकल्या विद्यार्थ्यांची साताऱ्यातून दिंडी काढण्यात आली .खांद्यावर छोट्या पताका आता टाळ मृदुंग आणि पारंपारिक वारकऱ्यांच्या वेशातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी ज्ञानबा माऊलीच्या नावाचा जयघोष करत शहरातून माऊलींची दिंडी काढली . त्या पावसातली दिंडी हे मनोहरी दृश्य सातारकरांनी अनुभवले

आषाढी एकादशीला संत संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांच्या पालख्या १७ जुलै रोजी पंढरपूर मध्ये पोहोचत आहे. आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर साताऱ्यातील विविध शाळांनी ज्ञानेश्वर माऊलींची दिंडी काढली होती. सातारा नगरपालिकेच्या स्फूर्ती विद्यामंदिर शाळा क्रमांक आठ येथील शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वारीचा अनुभव दिला .वारकऱ्यांच्या विषयातील सुमारे शंभरहून अधिक विद्यार्थी या वारी सहभागी झाले होते छोट्याशा चिमुकल्या पालखीमध्ये विठ्ठल रुक्मिणीच्या प्रतिमेस सजवण्यात आले होते त्याची पूजा माली नगराध्यक्ष सुजाता राजेमहाडिक नगरपालिका शिक्षण मंडळाच्या जयश्री इंगळे व मुख्याध्यापिका सुनीता कांबळे यावेळी उपस्थित होत्या. या दिडीमध्ये विठ्ठलाची वेशभूषा केलेल्या विद्यार्थ्याने लक्ष वेधून घेतले.



ही दिंडी शाळा परिसरातून निघाली तेथून कमानी हौद मार्गे देवी चौक देवी चौकातून फिरून हॉटेल आम्रपाली मार्गे पुन्हा गुरुवार पेठ परिसरातील शाळेकडे नेण्यात आली .रिमझिमत्या पावसामध्ये चिमुकल्यांच्या निघालेल्या दिंडीचे सातारकरांनी तोंड भरून कौतुक केले .प्रत्यक्ष ज्ञानेश्वर माऊलींची वारी काय असते हे विद्यार्थ्यांना कळावे आणि भारतीय संस्कृतीच्या त्यातल्या त्यात महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायाचा वारसा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावा आणि अध्यात्म विषयी विद्यार्थ्यांमध्ये एक बांधिलकी तयार व्हावी याकरिता ही वारी काढण्यात आल्याचे शाळा व्यवस्थापनाच्या वतीने सांगण्यात आले.

# रत्नागिरी जिल्ह्यात जोरदार पाऊस, चिपळूण- खेड शहरात पुराचे पाणी शिरले

जिल्ह्यात सलग दोन दिवस कोसळणा-या पावसामुळे चिपळूण, खेड, राजापूरसह संगमेश्वर शहर परिसरात पूर परीस्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यात आतापर्यत १७७ लोकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आले आहे. रत्नागिरी जिल्ह्यात कोसळणा-या मुसळधार पावसामुळे चिपळूण शहरातून जाणाऱ्या महामार्गावर ठिकठिकाणी पाणी साचल्याने महामार्गाला नदीचे स्वरूप आले आहे. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक संत गतीने सुरू होती. बहादुर शेख नाका ते पाग नाकापर्यंत ठिकठिकाणी वाहतूक कोंडी झाली. चिपळूण पोलीस ठाण्याच्या आवारातही पाणी साचले होते.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चुकीच्या कामामुळे शहरात पाणी भरण्याचे नवीन ठिकाण तयार होत आहेत की काय ? अशी येथील नागरिकांना भीती वाटू लागली आहे. पाग नाका



येथील रस्ता उंच करताना तेथे येणाऱ्या पावसाच्या पाण्याचा निचरा होईल याकडे लक्ष देण्यात आले नाही. त्यामुळे आता महामार्गावरील पाणी पोलीस स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावरून वाहत आहे. येथे गटाराचे पाणी थेट रस्त्यावर येत आहे. त्यामुळे बुरूमतळी भागातील मध्यवर्ती बस स्थानक ते पोलीस ठाणे हा रस्ता रविवारी दुपारपर्यंत पाण्यात गेला होता. सकाळी मुसळधार

## रत्नागिरी जिल्ह्यात जोरदार पाऊस

पाऊस सुरू असताना येथे दीड फूट पाणी साचले होते. त्या पाण्यातून वाहन चालकांना मार्ग काढताना कसरत करावी लागत होती. दुपारी पावसाचा जोर वाढल्यानंतर रस्त्यावर येणाऱ्या पाण्याचे प्रमाणही वाढले. त्यामुळे पोलीस ठाणे, अधिकारी व कर्मचारी निवासस्थान तसेच पोलीस कर्मचारी वसाहतीमध्ये पाणी साचले होते. येथील रस्ताही जलमय झाला होता. सुमारे दोन ते अडीच फूट पाणी रस्त्यावर आल्यानंतर या रस्त्यावरील वाहतूक बंद करण्यात आली.

संगमेश्वर तालुक्यात कोंड आंबेड-डिंगणी-कर्जुवे, धामणी, कसबा, फणसवणे भागात जि. प. रस्त्यावर पाणी भरलेले असल्याने सदरच्या भागातील वाहतूक बंद ठेवण्यात आली आहे. सर्वांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. खेड येथील जगबुडी नदी धोक्याच्या पातळीवर वाहत आहे. खेड शहर भागातील चिपळून नाका, तळ्याचे वाकन परिसर येथील १७७ लोकांना स्थलांतरित करण्यात आले आहे.

दापोली मंडणगड या रस्त्यावर पालगड पवारवाडी पुलावरून पाणी जात असल्याने छोट्या वाहनांना वहातुकीला बंदी केली आहे. मंडणगड तालुक्यातील भारज नदीला पूर आला असून चिंचगर मांदिवली पुलावरून पाणी जात आहे. या ठिकाण वाहतूक बंद करण्यात आली आहे. मंडणगड तालुक्यातील पालघर येथील ग्रामस्थ दीपक शंकर तांबुटकर भारजा नदीच्या पात्रात पडून वाहून गेले होते. त्यांना आपतकालीन पथकामार्फत वाचविण्यात यश आले. खेड येथील पुराची परिस्थिती बघता पुणे येथून एन. डी. आर. एफ पथकाला पाचारण करण्यात आले आहे. जिल्ह्यात पडणाऱ्या पावसाचा फटका कोकण रेल्वेला देखील बसला आहे. कोकण रेल्वेच्या मार्गावरील दिवाणखवटी आणि व्हीनेरे दरम्यान दरड कोसळल्यामुळे त्या ठिकाणी कोकण रेल्वेची वाहतूक रोखण्यात आली आहे.

बाकी मार्गावरील वाहतूक सुरू असून माती, दगड दूर करण्यासाठी यंत्रणा कामगार घटनास्थळी पोहोचले आहेत. किमान दोन ते अडीच तासांनी हा मार्ग मोकळा होईल असे अपेक्षित असल्याचे रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. जिह्यातील जगबुडी नदीने धोक्याची पातळी ओलाडली आहे तर वाशिष्ठी नदी, कोंदवली आणि मुचकुंदी नदी इशारा पातळीच्या वर वहात आहेत. जिल्ह्यात रविवारी १२२.६४ टक्के मिली मीटर तर दिवसभरात ११०३.७३ एवढा सरासरी पाऊस पडला आहे.